# बलात्काराच्या गुन्हयातील आरोपी निघाला अट्टल चोरटा आरोपीकडुन दोन मोटरसायकल चोरीचे गुन्हे उघड

अल्पवयीन पिडीत मुलगी हिला आरोपी नामे विशाल उर्फ वांढुर वसंतराव उरवते, वय १९ वर्षे, रा. संत कबीर वार्ड, हिंगणघाट याने पिडीत मुलगी हि अल्पवयीन असल्याचे माहित असून सुद्धा तीचेशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले व कोणालाही याबाबत सांगितल्यास तिला जीवे मारण्याची धमकी दिली. सदर प्रकरणी दिनांक ०२/०६/२०२१ रोजी फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पो.स्टे हिंगणघाट येथे अपराध क्र. ४८८/२०२१ कलम ३७६ (३), २९४, ३२३, ५०६ भादंवि सहकलम ४, ५, (एल) ६, ८ पोक्सो प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल होताच पो.स्टे. हिंगणघाट येथील गुन्हे प्रकटीकरण प्रथकाने हिंगणघाट शहर व लगतचे परिसरात सतत माहीती काढुन आरोपी नामे विशाल उर्फ वांढुर वसंतराव उरवते, वय १९ वर्षे, रा. संत कबीर वार्ड, हिंगणघाट यास ताब्यात घेतले. सदर गुन्ह्यातील आरोपी याचेवर यवतमाळ, पांढरकवडा, वरोरा, नागपुर (शहर) व बुट्टीबोरी येथे अनेक चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे चौकशीवरून दिसून आले. सदर आरोपी हा पोलीस स्टेशनचे रेकॉर्ड वरील अट्टल घरफोडी व मोटरसायकल चोरी करणारा असल्याने त्याची सखोल विचारपुस केली असता आरोपी विशाल उरवते याने हिंगणघाट व पांढरकवडा येथुन दोन पल्सर मोटरसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्यावरून आरोपीकडून त्याने कबुल केलेल्या दोन्ही गुन्ह्यातील मोटरसायकल जप्त करून पोलीस स्टेशन हिंगणघाट येथील १ गुन्हा व पोलीस स्टेशन पांढरकवडा येथील १ गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री प्रशांत होळकर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री यशवंत सोळंके, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट श्री पियुष जगताप यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री संपत चव्हाण, पोलीस स्टेशन, हिंगणघाट यांचे निर्देशाप्रमाणे पोउपनि. श्री पपिन रामटेके, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अंमलदार शेखर डोंगरे, विवेक बनसोड, निलेश तेलरांधे, सचिन घेवंदे, विशाल बंगाले, सचिन भारशंकर, सुहास चांदोरे, पंकज घोडे, प्रशांत वाटखेडे, उमेश बेले यांनी केली.